2 9 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# राष्ट्रीय युवा महोत्सवाची जय्यत तयारी

## १० ते १४ फेब्रुवारी दरम्यान रंगणार युवा महोत्सव

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठामध्ये शुक्रवार १० ते मंगळवार १४ फेब्रुवारी २०१७ मध्ये राष्ट्रीय युवा महोत्सव होणार आहे. १० फेब्रुवारी सकाळी दुपारी ३ वाजता शोभायात्रेने सुरूवात होईल. सायंकाळी ५ वाजता उद्‌घाटन होणार आहे. शनिवार ११ ते सोमवार १३ फेब्रुवारीपर्यंत विविध स्पर्धा होणार आहेत. तर मंगळवार १४ फेब्रुवारी रोजी समारोपप्रसंगी पारितोषिक वितरण कार्यक्रम होणार आहे. युवा महोत्सवामध्ये देशभरातून विविध विद्यापीठातील संघ सहभागी होणार आहेत. या राष्ट्रीय युवा महोत्सवाची विद्यापीठ वर्तुळात जय्यत तयारी सुरू आहे, अशी माहिती विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.

राष्ट्रीय युवा महोत्सव घेण्यासाठी शिवाजी विद्यापीठाला परवानगी द्यावी, असा प्रस्ताव असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीला पाठवण्यात आला होता. या प्रस्तावाला सप्टेंबरमध्ये मंजुरी मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय



युवा महोत्सवाची तयारी ९० टक्के झाली आहे. कोणता कलाप्रकार कोठे घ्यायचा, याला परीक्षक कोण, एका कलाप्रकाराला बक्षीस काय द्यायचे, शील्ड कोणत्या प्रकारचे असले पाहिजे या सर्व गोष्टींसाठी विविध कमिट्यांची नियुक्ती केली आहे. विविध विद्यापीठातून आलेल्या संघांच्या निवासाची सोय , सादरीकरणाचे नियोजन, भोजन व्यवस्था, परीक्षकांची निवड, कार्यक्रम पत्रिका जवळपास तयार झाली आहे. देशभरातून आलेल्या विद्यापीठांतील संघांना कोणत्याही प्रकारची उणीव भासू नये म्हणून युवा महोत्सवाचे पूर्ण नियोजन केले आहे.

राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या माध्यमातून विविध विद्यापीठातील सांस्कृतिक विचारांची देवाण घेवाण होऊन, भारतीय एकात्मतेचा संदेश युवा कलाकारांना मिळतो. त्याचबरोबर लोप पावत चाललेल्या पारंपरिक लोकसंस्कृतीचा वारसा तरूणाईने पुढच्या पिढीपर्यंत नेऊन पोहचवला पाहिजे. म्हणून राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सूरवाद्य, मूकनाट्य, लोकनृत्य, सुगम गायन, समूहगीत, लोककला, लोकवाद्यवृंद, शास्त्रीय गायन, लघुनाटीका, ऑन दि स्पॉट फोटोग्राफी, वादविवाद, भाषण स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पारंपारीक वेशभूषा, क्लासिकल डान्स, यासारख्या जवळपास २६ कलाप्रकारांचा समावेश केला आहे.

### अशी केली युवा महोत्सवची व्यवस्था

युवा महोत्सवाचे नियोजन करण्यासाठी २६ कमिट्या तयार केल्या आहेत. या कमिट्यांना स्टेज व्यवस्था, निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, शिल्ड आदी कामे वाटून दिली आहेत. युवा महोत्सवातील सर्व कलाप्रकार पाच ठिकाणी होणार आहेत. यामध्ये लोककला केंद्र, भाषा भवन वि. स. खांडेकर सभागृह, म्युझिक विभाग, वनस्पतीशास्त्र निलांबरी सभागृह, मानव्यशास्त्र सभागृह या ठिकाणी सादरीकरण केले जाणार आहे.

2 9 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# विद्यापीठात चित्रशारदाच्या स्पर्धेचे उद्घाटन

## ३०० स्पर्धकांचा सहभाग, आज ठरणार विजेते

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

अखिल भारतीय चित्रपट महामंडळ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या सहकार्याने अविरत प्रॉडक्शनतर्फे आयोजित चित्रशारदा या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी झाले. यामध्ये ३०० स्पर्धकांनी सहभाग घेतला असून रविवारी विजेत्यांची निवड केली जाणार आहे.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी अखिल भारतीय चित्रपट महामंडळाच्यां सहकार्याने विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी 'चित्रशारदा' हा आगळावेगळा उपक्रम सुरू केला आहे. यामध्ये 'स्क्रिप्ट इट', 'ॲक्ट इट' आणि 'लाईट युअर सेट' या तीन विषयांवर ही स्पर्धा बेतलेली आहे. स्पर्धेत कोल्हापूर, सांगली आणि सातारा या जिल्ह्यांतून ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. रविवारी अष्टविनायक मीडियातर्फे विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा अयोजित करण्यात आली आहे. रविवारी या स्पर्धेचा दुसरा भाग पार पडणार असून यामध्ये विजेत्या स्पर्धकांना सन्मानित करण्यात येणार आहे.

उद्घाटन अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. डी. नांदिवडेकर, चित्रपट दिग्दर्शक कांचन नायक, ज्येष्ठ कॅमेरामन चारू दुखंडे, लेखक राज काजी, राज कुबेर, जित शिरोळे, रणजित जाधव, शरद चव्हाण, विजय खोचीकर, अरुण चोपदार आदींची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : अविरत प्रॉडक्शनतर्फे आयोजित चित्रशारदा या स्पर्धेत ॲक्ट इट सादर करताना स्पर्धक.

(छाया : अमर कांबळे)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2017
लोकमत

# एमबीए सी.ई.टी. कार्यशाळा

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए अधिविभागातर्फे गुरुवारी (दि. २ फेब्रुवारी) एम.बी.ए. सी.ई.टी. कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना एम.बी.ए.च्या सी.ई.टी.बाबतचा अभ्यासक्रम तसेच एम.बी.ए.च्या प्रवेश प्रक्रियेमधील सविस्तर माहिती दिली जाणार आहे. एम.बी.ए. सी.ई.टी. कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. याचा लाभ विद्यार्थ्यांनी लाभ घेण्यासाठी डॉ. रामानुजन सभागृह गणित अधिविभाग, येथे संपर्क साधावा, असे आवाहन संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2017
सकाळ





राजेंद्र चव्हाण    राजेंद्र चव्हाण

# राजेंद्र चव्हाण अध्यक्षपदी

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी राजेंद्र विष्णू चव्हाण, तर उपाध्यक्षपदी जनार्दन किसन सुरकुले यांची एकमताने निवड झाली. या वेळी संचालक रामराव तुपे, राजाराम शिंदे, अरविंद पाटील, विशांत भोसले, रमेश नरके, विजय पाटील आदी उपस्थित होते.